प्रेस नोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अमरावती
दिनांक : ३०.०७.२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) श्री.विनय अर्जुन तायडे, वय ४८ वर्षे, पद : उप कार्यकारी अभियंता, उप विभागीय कार्यालय म.रा.वि.वि.कं.मर्या. धारणी जि. अमरावती. वर्ग २.<br>२) श्री.गोपाल मोहनलाल खडके, वय ३६ वर्षे, पद : सुरक्षा रक्षक (कंत्राटी), उप विभागीय कार्यालय म.रा.वि.वि.कं.मर्या. धारणी जि.अमरावती. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक ३०/०६/२०२२ चे १४.४४ वा. ते १४.५७ वा.दरम्यान |
| ४ | स्विकारलेली लाच रक्कम | ५,०००/— रुपये |
| ५ | घटनास्थळ | एम.एस.ई.बी. कॉलनी, बिल्डींग नं १, क्वॉर्टर नं ३, धारणी, जि. अमरावती. |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक ०९/०६/२०२२ रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ३०/०६/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांना त्यांच्या घरा समोरील इलेक्ट्रीक पोल वर तार केबल जोडण्याकरीता उप विभागीय कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मर्या, धारणी येथील उप कार्यकारी अभियंता श्री. विनय तायडे यांनी ५,०००/—रूपये लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम श्री.गोपाल खडके, सुरक्षा रक्षक (कंत्राटी) यांचेकडे देण्याचे सांगुन स्विकारण्याचे मान्य केले.

त्यानंतर आज दिनांक ३०/०६/२०२२ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान उप विभागीय कार्यालय म.रा.वि.वि.कं.मर्या. धारणी येथील श्री.गोपाल खडके, सुरक्षा रक्षक (कंत्राटी) यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम ५,०००/— रुपये स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. वरुन नमुद दोन्ही आरोपीविरुध्द पो.स्टे.धारणी, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, श्री.संजय महाजन, पोलीस उपअधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधिक्षक श्री.किशोर म्हसवडे व आम्ही पो.नि.योगेशकुमार दंदे, पो.नि. संतोष इंगळे, पो.ना.विनोद कुंजाम, कुनाल काकडे, रोशन खंडारे पो.कॉ.शैलेश कडु, चा.स.पो.उ.नि.सतीष किटकुले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,
ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती

टोल फ्री क्रमांक : १०६४

दुरध्वनी क्रमांक : ०७२१—२५५२३५५,२५५३०५५

P.L.

(योगेशकुमार दंदे)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.नं.९५९[illegible]

Shot on OnePlus
Powered by Triple Camera

Scanned with CamScanner